**भारतीय रिझर्व बँक**
**RESERVE BANK OF INDIA**
**WWW. rbi. org. in**

**आरबीआय/२०११-१२/६४**
**डीबीओडी.क्रमांक.एफएसडी.बीसी.१५/२४.०१.००१/२०११-१२**

**जुलै १, २०११**
**आषाढ १०,१९३३ (शक)**

**सर्व सूचीकृत व्यापारी बँकांना**
**(विभागीय ग्रामीण बँका वगळून)**

**महोदय,**

**बँकिंग शी संलग्न व्यवसाय**

या विषयावरील ३० जून २०१० पर्यंतच्या सर्वसूचना / मार्गदर्शक तत्वे एकत्र करणारे आमचे मुख्य परिपत्रक क्रमांक डीबीओडी एफएसडी बीसी ७ /२४.१.००१/ २०१०-११ दिनांक १ जुलै, २०१० पहावे. याबाबत ३० जून २०११ पर्यंतच्या सर्वसूचना एकत्र करुन मुख्य परिपत्रक अद्यतन केले आहे. हे परिपत्रक रिझर्व बँकेच्या संकेत स्थळावर (http://www.rbi.org.in/)उपलब्ध आहे. या मुख्य परिपत्रकाची प्रत जोडली आहे. बँकांच्या क्रेडिट कार्डाच्या व्यवहाराबाबत वेगळे मुख्य परिपत्रक जारी केले आहे.

आपला विश्वासु,

**(ए.के.खौंड)**
**प्रभारी मुख्य महाप्रबंधक**

संलग्न : वरील प्रमाणे

<u>**अनुक्रमाणिका**</u>


| परिच्छेद | विषय |
|---|---|
| अ | उद्देश |
| ब | वर्गीकरण |
| क | पूर्वीची मार्गदर्शक तत्वे एकत्र करणे |
| ड | लागू होण्याच्या मर्यादा |
| १ | परिचय |
| २ | उपकंपन्या |
| ३ | आर्थिक सेवा कंपन्यामधील गुंतवणूक मर्यादा इ. |
| ४ | उपकरणे भाडयाने देणे, भाडे खरेदी व्यवसाय व अडत्याच्या (फॅक्टरींग) सेवा |
| ५ | उपकरणे भाडयाने देणे, भाडे खरेदी व्यवसाय व अडत्याच्या (फॅक्टरींग) सेवा |
| ६ | बँकांनी प्राथमिक दलाली व्यवसाय करण्याची मार्गदर्शक तत्वे |
| ७ | म्युच्युअल फंड व्यवसाय |
| ८ | उप कंपन्याबरोबरचे संबंध |
| ९ | स्मार्ट/डेबिट कार्ड व्यवसाय |
| १० | मनी मार्केट म्युच्युअल फंड (एम.एम.एम.एफ.) |
| ११ | मनी मार्केट म्युच्युअल फंडस् साठी चेकबुक लिहिण्याची सुविधा |
| १२ | बँकाचा विमा व्यवसाय प्रवेश |
| १३ | बँका द्वारे पेन्शन फंडचे व्यवसाय |
| १४ | कंपन्यांच्या शेअर्सचे व कर्जरोख्यांचे अंडररायटिंग |
| १५ | सार्वजनिक कंपन्यांच्या कर्जरोख्यांचे अंडररायटिंग |
| १६ | सुरक्षित जाळे (सेफ्टीनेट) योजना |
| १७ | रेफरल सेवा |
| **१८** | **कमिशन्स/मानधनांचे जाहिरीकरण** |
| **सूची-१-** स्मार्ट कार्ड/डेबिट कार्ड जारी करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे | |
| **सूची-२-** स्मार्ट कार्ड/डेबिट कार्डच्या वापराच्या अहवालाचे प्रारूप | |
| **सूची-३-** विमा व्यवसायात बँकांचा प्रवेश | |
| **सूची-४-** विमा व्यवसायात बँकांचा प्रवेश | |
| **सूची-५-** बँकांनी पेन्शन फंड मॅनेजर म्हणून काम करण्याची मार्गदर्शक तत्वे | |
| **सूची-** प्रमुख परिपत्रकात एकत्र केलेल्या परिपत्रकांची यादी | |

**प्रमुख परिपत्रक - बँकांशी संलग्न व्यवसाय**

**अ. उद्देश**

रिझर्व बँकेने दिलेल्या अनुमतीनुसार व्यापारी बँकांनी बँकिंगशी संलग्न व्यवसाय करण्यासाठी किंवा काही वित्तीय सेवा प्रदान करण्याचा व्यवसाय करण्यासाठी नियंत्रक चौकट/नियम/ सूचना घालून देणे. बँकांनी अंगीकृत केलेले हे व्यवसाय सुरळीत व योग्य मार्गाने चालावेत यासाठी बँकांनी योग्य सुरक्षिततेचे उपाय योजावेत व खाली दिलेली मार्गदर्शक तत्वे पाळावीत.

**ब. वर्गीकरण**

(अ) रिझर्व बँकेने घालून दिलेली कायदेशीर मार्गदर्शक तत्वे

**क. पूर्वीची मार्गदशक तत्वे एकत्र करणे**

या मुख्य परिपत्रकात पूर्वीची सर्व मार्गदर्शक तत्वे एकत्र केली आहेत.

**ड. लागू होण्याच्या मर्यादा**

ज्या सूचीकृत बँका त्यांच्या विभागाद्वारे, त्यांच्या उपकंपन्याद्वारे किंवा त्यांच्या नियंत्रणाखालील सहयोगी कंपन्याद्वारे वित्तीय सेवा किंवा बँकिंगशी संलग्न व्यवसाय अंगीकृत करतात त्या सर्व सूचीकृत बँकांना ही मार्गदर्शक तत्वे लागू होतील.

**रचना**

**१. परिचय**
**२. उप कंपन्या**
**३. वित्तीय सेवा कंपन्यामध्ये गुंतवणूक मर्यादा इत्यादी.**
**४. उपकरणे भाडयाने देणे, भाडे खरेदी व अडत्यांच्या (फॅक्टरीग) सेवा**
**५. उपकरणे भाडयाने देणे, भाडे खरेदी व्यवसाय व अडत्याच्या (फॅक्टरीग) सेवा**
**६. बँकांनी प्राथमिक दलाली व्यवसाय करण्याची मार्गदर्शक तत्वे**
**६.१ पात्रतेचे दंडक**
**६.२ अधिकारप्रदान**
**६.३ बँक प्राथमिक विक्रता व्यवसायाच्या जबाबदा-या**
**६.४ सारासार विचार मानदंड**
**६.५ नियंत्रण व निरीक्षण**
**६.६ प्राथमिक विक्रेता व्यवसायासाठी अर्ज**
**६.७ बँक प्राथमिक विक्रता व्यवसायासाठी जारी केलेली मार्गदर्शक तत्वे लागू होणे**
**७. म्युच्युअल फंड व्यवसाय**
**८. उप कंपन्याबरोबरचे संबंध**
**९. स्मार्ट/ डेबिट कार्ड व्यवसाय**
**१०. मनी मार्केट म्युच्युअल फंड (एम.एम.एम.एफ.)**
**११. मनी मार्केट म्युच्युअल फंडस्साठी चेकबुक लिहिण्याची सुविधा**
**१२. बँकांचा विमा व्यवसाय प्रवेश**
**१३. बँका द्वारे पेन्शन फंडचे व्यवसाय**
**१४. कंपन्यांच्या शेअर्सचे व कर्जरोख्यांचे अंडररायटिंग**
**१५. सार्वजनिक कंपन्यांच्या कर्जरोख्यांचे अंडररायटिंग**
**१६. सुरक्षित जाळे (सेफ्टीनेट) योजना**
**१७. रेफरल सेवा**
**१८. कमिशन्स/मानधनांचे जाहिरीकरण**

**सूची-१-** स्मार्ट कार्ड/डेबिट कार्ड जारी करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे
**सूची-२-** स्मार्ट कार्ड/डेबिट कार्डच्या वापराच्या अहवालाचे प्रारूप
**सूची-३-** विमा व्यवसायात बँकांचा प्रवेश
**सूची-४-** विमा व्यवसायात बँकांचा प्रवेश
**सूची-५-** बँकांनी पेन्शन फंड मॅनेजर म्हणून काम करण्याची मार्गदर्शक तत्वे
**सूची-** प्रमुख परिपत्रकात एकत्र केलेल्या परिपत्रकांची यादी

**१. परिचय**

बँका आपल्या ग्राहकांना काही आर्थिक सेवा किंवा बँकिंगशी संलग्न सेवा आपल्या विभागाद्वारे किंवा उप कंपन्यांद्वारे देऊ शकतात. या कारणासाठी जो व्यवसाय सुरू करायला अनुमती आहे असा व्यवसाय करण्यासाठी बँका रिझर्व बँकेच्या पूर्वपरवानगीने उपकंपन्या स्थापन करू शकतात. अशा त-हेचा व्यवसाय रिझर्व बँकेच्या परवानगीने सुरू करण्याबाबतच्या सूचना या परिपत्रकात एकत्र केलेल्या आहेत.

**२. उपकंपन्या**

बँकिंग नियंत्रण कायदा १९४९ च्या कलम १९(१) नुसार बँकांना कलम ६ च्या (अ) तो (आ) उपकलमानुसार अन्यथा चालू करायला परवानगी असलेले व्यवसाय सुरू करण्यासाठी उपकंपन्या स्थापन करू शकतात. तसेच हे व्यवसाय परदेशात सुरू करण्यासाठी व भारत सरकारने मान्यता दिलेले इतर व्यवसाय या उपकंपन्या सुरू करू शकतात.

**३. आर्थिक सेवा कंपन्यामधील गुंतवणूक मर्यादा इ.**

वित्तीय सेवा कंपन्यात गुंतवणूक करण्याची मर्याद-बँकिंग कंपनी नियंत्रण कायदा १९४९ च्या कलम १९(२) नुसार बँकिंग कंपनी कोणत्याही कंपनीच्या भाग भांडवलाच्या 30% किंवा स्वतःच्या भरणा झालेल्या (पेडअप) भाग भांडवल अधिक (गंगाजळी) याच्या 30% या पैकी जे कमी असेल त्यापेक्षा जास्त भाग भांडवल गहाण ठेवणारे (लिजी/मॉर्रगेजी) म्हणून किंवा मालक म्हणून घेऊ शकत नाही. त्याच प्रमाणे बँकेची उपकंपनी, वित्तीय सेवाकंपनी, वित्तीय संस्था, प्रतिभूती विनियम केंद्र यातील, गुंतवणूक बँकेच्या भरणा झालेल्या (पेडअप) भाग भांडवल अधिक मुक्त गंगाजळी याच्या १०% पेक्षा जास्त असता कामा नये. तसेच अशा त-हेची सर्व गुंतवणूक एकूण मिळून बँकेच्या भरणा झालेल्या (पेडअप) भाग भांडवल अधिक (गंगाजळी) यांच्या २०% पेक्षा जास्त असता नये. ज्या गुंतवणूकी ट्रेझरी व्यवसायचा भाग म्हणून निव्वळ व्यापारासाठी केलेल्या आहेत. त्या 20% मर्यादेतून वगळता येतील. त्या गुंतवणुकीसाठी रिझर्व बँकेच्या परवानगीची आवश्यकता असणार नाही. मात्र त्यासाठी बँकांच्या गुंतवणुकीचे वर्गीकरण, किंमत काढणे व कार्य याचे मानदंड याबाबतच्या मुख्य परिपत्रकात नमूद केल्या प्रमाणे, या गुंतवणुकी 'व्यापारासाठी धारण केलेल्या' या प्रकारात गणल्या गेल्या पाहिजेत व ९० दिवसापेक्षा जास्त दिवस धारण केल्या जाता नयेत. परंतु बँका रिझर्व बँकेच्या खास पूर्व परवानगी विना वित्तीय सेवा संघटना (व्हेंचर्स) च्या भाग भांडवलात जसे प्रतिभूती विनीमय केंद्र (स्टॉक एक्सचेंज), डिपॉझिटरी इ. भाग ल्या गुंतवणुकी बँकींग नियंत्रण कायदा १९(२) च्या मर्यादेत असल्या तरी भाग घेऊ शकत नाही.

**४. उपकरणे भाडयाने देणे, भाडे खरेदी व्यवसाय व अडत्याचा (फैक्टरिंग व्यवसाय)**

रिझर्व बँकेच्या पूर्वपरवानगीने बँका वरील व्यवसायासाठी उपकंपन्या स्थापन करू शकतात. अशा कंपन्यांनी वरील व्यवसाय व तदनुषांगिक व्यवसाय प्रामुख्याने केला पाहिजे म्हणजेच त्यांनी रिझर्व बँकेने मान्यता न दिलेले व्यवसाय तसेच थेट कर्ज देणे व वरील व्यवसायात गुंतलेल्या संस्थांना अर्थ सहाय्य देणे. अशा गोष्टी करू नयेत.

**५. उपकरणे भाडयाने देणे, भाडे खरेदी व्यवसाय व अडत्याच्या (फॅक्टरीग) सेवा**

भाडे खरेदी व्यवसाय व अडत्याचा (फॅक्टरिंग) व्यवसाय वरील व्यवसाय बँक आपल्या खात्याचे काम म्हणून करू शकतात. त्यासाठी रिझर्व बँकेच्या पूर्व परवानगीची आवश्यकता नाही. मात्र ज्या शाखेत हा व्यवसाय चालती त्या शाखांच्या नावासह या व्यवसायाची माहिती बँकांनी रिझर्व बँकेला द्यावी. त्यासाठी बँकांनी खालील मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे.

१) वरील व्यवसायाला तज्ञ कर्मचारी व पुरेशा पायाभूत सुविधा यांची आवश्यकता असते, त्यामुळे बँकेच्या निवडक खात्यातच हा व्यवसाय सुरू करावा.

२) हा व्यवसाय कर्जाच्या व्यवसाया बरोबरचा गणला जावा व भांडवल, जोखीम मालमता हे गुणोत्तर काढताना त्यात १००% जोखीम महत्व द्यावे. त्याच प्रमाणे आय (इन्कम) ओळखणे, मालमता वर्गीकरण व तरतूद (प्रोव्हिजन) करणे. यासाठी मार्गदर्शक तत्वे याला लागू होतील.

३) वरील व्यवसायाद्वारे दिल्या गेलेल्या सुविधा एका कर्जदाराच्या मर्यादेत गणल्या जातील म्हणजे बँकेच्या भांडवली पैशाच्या १५%] आणी जर दिलेले कर्ज पायाभूत सुविधांच्यासाठी असेल तर २०% व कर्जदारांच्या समूहासाठी याच मर्यादा ४०% O ५०% अशा आहेत. अपवादात्मक परिस्थितीमध्ये बँका निदेशक मंडळाच्या पूर्व अनुमतीने दोन्हीसाठी (एकटा कर्जदार व अर्जदारांचा समूह) यांच्या मर्यादात ५% पर्यंत वाढ करू शकतात. मात्र त्यासाठी कर्जदाराने वार्षिक अहवालात तशी नोंद करण्यासाठी बँकेला अनुमती दिली पाहिजे. गैर बँकिंग वित्तीय कंपन्यांना बँकांनी कर्ज देण्याबाबत परिपत्रक क्रमांक डीबीओडी क्रमांक एफएसडीबीसी.४६/२४.०१.०२८/२००६-०७ दिनांक १२ डिसेंबर २००६ मधील परिच्छेद १६(अ)(१) मधील वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार लागू पडतील.

४) बँकांनी एकूण कर्ज तसेच उपकरणे भाडयाने देणे, भाडे खरेदी व्यवसाय व अंडत्याच्या (फॅक्टरींग) सेवा यांचा संतुलित पोर्टफोलियो ठेवावा. यातील प्रत्येक गोष्टीतील कर्जपुरठा एकूण कर्ज पुरवठयाच्या १०% पेक्षा जास्त असू नये.

५) बँकांनी भाडेपट्टा (लिजींग) व्यवसायाबद्‌ल निदेशक मंडळाच्या अनुमतीने योग्य धोरण आखावे व मालमत्ता व जोखीम यांचे असंतुलन होणे टाळता येईल. बँका भाडेपट्टीची मुदत ठरवायला त्यांचा धोरणानुसार मोकळया आहेत. मात्र त्यासाठी त्यांनी इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाउंटटस् ऑफ इंडिया (आय.सी.ए.आय.) ने घालून दिलेल्या लेखा दंडक १९ (एएस १९) (अकाउंटींग स्टॅडर्ड) मध्ये घालून दिलेल्या मर्यादेचे पालन करावे.

६. इन्टिटयूट ऑफ चार्टड अकाउंटटस् ऑफ इंडिया नियामक मंडळाने जारी केलेल्या ''लेखामान दंड १९ लेसींज'' मध्ये व्याख्या केल्यानुसार वित्तिय आय मधला भाडयाने दिलेल्या मालमत्ते वरील मालमता निकामी होण्याआधीचा व न मिळालेला वित्तीय चार्जचा घटक फिरवून घ्यावा व चालू वित्तीय वर्षात त्याची तरतूद करावी.

७. मालमत्तेचे वर्गीकरण, आय ओळखणे व कर्जासाठी व इतर पतपुरवठयासाठी तरतूद करणे यासाठीच्या तरतुदी ज्या बँका खात्याद्वारे भाडेपट्टयाचे काम करतात त्यांच्या भाडयाने दिलेल्या मालमत्तेला लागू होतात.

८. बँकांनी उपकरण भाडयाने देणा-या कंपन्याबरोबर व या व्यवसायातील इतर गैर वित्तिय बँकिंग कंपन्यांबरोबर भाडे करार करू नये.

९. अडत्याचा व्यवसाय खात्याद्वारे करणा-या बँकांनी ग्राहकाच्या खेळत्या भांडवलाच्या गरजा काळजीपूर्वक ध्यानात घ्याव्यात व त्यासाठी खरेदी केलेली देयके ध्यानात घ्यावीत. जे देयके खरोखरीची व्यापारी व्यवहार दर्शवतात, त्यांच्या बाबतीतच अडत्यांची सेवा द्यावी. अडत्यांची सेवा देताना ग्राहकाला आवश्यकतेपेक्षा जास्त अर्थसहाय्य दिले जात नाही याची काळजी बँकांनी घ्यावी.

१०. विभागिय घटकीय सेवा हाती घेताना बँकांनी अशिलाच्या कार्यकारी भांडवलाच्या गरजांना काळजीपूर्वक तपासताना खरेदीकेलेल्या इनवॉईसेसना लक्षात घेणे गरजेचे आहे. घटकीय सेवांना अशा इनवॉईसेसच्या बाबतीत वाढवले पाहिजे, ज्यांच्यामध्ये वास्तविक स्वरुपाच्या व्यापारी व्यवहारांचे प्रतिनिधीत्व झाले असेल. बँकांनी घटकीकरण सेवांना वाढविण्यामार्फत अशिलाला अतिवित्तपुरवठा होत नसल्याचीविशेष स्वरुपात हमी करुन घेणे महत्वाचे आहे.

**६. बँकांनी प्राथमिक विक्रेत्याचा व्यवसाय करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे.**

प्राथमिक विक्रेत्याचा (पीडी) व्यवसाय करण्यासाठी अनुमती दिलेली चौकट आता विस्तारली गेली आहे व त्यात बँकांचा समावेश झाला आहे. किमान पात्रतेच्या अटींची पूर्तता करणा-या बँकांनी रिझर्व बँकेकडे हा व्यवसाय करण्यासाठी अर्ज करावा.

**६.१ पात्रतेच्या अटी**

खालील बँका प्राथमिक विक्रेत्याच्या व्यवसायासाठी अर्ज करू शकतात.

१) ज्या बँकांची सध्या पूर्णतः किंवा अंशतः मालकीची उपकंपनी नाही व ज्या खालील अटींची पूर्तता करतात

अ) किमान स्वतःचे वित्त - रू.१००० कोटी (नेट ओन्ड फंडस्)

ब) किमान सी.आर.ए.आर. - ९%

क) निव्वळ, उत्पन्न न देणारी मालमत्ता ३% पेक्षा कमी. गेले ३ वर्षे फायदा मिळालेला असला पाहिजे.

२) ज्या भारतीय बँका त्यांच्या अंशतः किंवा पूर्णतः मालकीच्या उपकंपन्याद्वारे प्राथमिक विक्रेत्याचा व्यवसाय करीत आहेत व त्यांना अशा कंपन्याशी विलय करून हा व्यवसाय करायचा आहे व त्यांना आपल्या खात्याद्वारे हा व्यवसाय करायचा आहे. त्यांनीही वरील ६.१ (अ) ते (क) अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

३) ज्या परदेशी बँका भारतात कार्य करतात व आपल्या गट कंपन्या बंद/विलय करून ज्यांना प्राथमिक विक्री व्यवसाय सुरू करायचा आहे अशांना ही वरील ६.१ (अ) ते (क) अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**६.२ अधिकार देणे**

रिझर्व बँक सुरूवातीला एक वर्ष (जुलै-जून) अधिकार देईल व त्यानंतर दर वर्षी त्याचे पुनरावलोकन करील.

**६.३ बँक प्राथमिक व्यवसायाची जबाबदारी**

बँकेने अंगीकृत केलेल्या प्राथमिक व्यवसायाला इतर प्राथमिक व्यवसायाला लागू असलेली सर्व अंडररायटिंग व जबाबदा-या लागू होतील.

**६.४ सारासार विचार दंडक**

१) प्राथमिक विक्रेता व्यवसायास वेगळया भांडवल पूर्णत्व आवश्यकता ठरवल्या नाहीत. बँकेला लागू असणा-या नेहेमीच्या भांडवल पूर्णत्वाच्या आवश्यकता/जोखीम व्यवस्थापनाची मार्गदर्शन तत्वे प्राथमिक विक्रेता व्यवसायाला लागू पडतात. या व्यवसायापासून जी जोखीम निर्माण होते
ती मोजणे व त्यापासून बँकेच्या हिताचे संरक्षण करणे यासाठी हा व्यवसाय करणारी बँक पुरेशा जोखीम व्यवस्थांची उपाय योजना करेल.

२) जर सरकारी दिनांक प्रतिभूती व ट्रेझरी बिल्स वैधानिक तरलता गुणोत्तर प्रतिभूती (स्टॅटयूटरी लिक्वीडीटी रेशो) (एस.एल.आर.) म्हणून रिझर्व बँकेने सूचित केल्या तर वैधानिक तरलता गुणोत्तरासाठी धरल्या जातील.

३) 'व्यापारासाठी स्वीकारलेला पोर्टफोलियो' या बाबतच्या वर्गीकरण, किंमत ठरवणे व व्यवहार या बाबत बँकेला लागू असलेल्या मार्गदर्शक तत्वे प्राथमिक विक्रेता व्यवसायासाठी स्वीकारलेल्या सरकारी दिनांक प्रतिभूती व ट्रेझरी बिल्सना लागू होतील.

४) बँकांना त्यांच्या उपकंपन्यांसाठी वेगळी एस.जी.एल. खाती ठेवावी लागतील. बँकांनी याबाबत वेगळी व्यवस्थापन माहिती यंत्रणा निर्माण करावी.

## ६.५ नियंत्रण व देखरेख

१) प्राथमिक विक्रेत्यांना लागू असलेल्या रिझर्व बँकेच्या सूचना बँक प्राथमिक विक्रेत्यांनाही योग्य त्या त-हेने लागू होतील.

२) बँक रिझर्व बँकेच्या कॉल मनी मार्केट व लिक्विडिटी ॲडजेस्टमेंट फॅसिलिटी या सुविधांचा फायदा घेऊ शकते व म्हणून बँक प्राथमिक विक्रेता या सुविधांचा फायदा घेऊ शकणार नाही.
३) रिझर्व बँक प्राथमिक व्यवसायाचे जागेवरच निरीक्षण करील.
४) रिझर्व बँक जसजसे आदेश देईल तसतसे बँक प्राथमिक विक्रेता ठरवलेले अहवाल रिझर्व बँकेला पाठवत जाईल.
५) बँक प्राथमिक विक्रेत्या विरूद्ध महत्वाची तक्रार झाली तर त्याची, किंवा प्रतिभूती विनिमय केंद्रे, सेबी, सीबीआय, अंमल बजावणी अधिकारी, आयकर खाते इत्यादींनी त्यांच्या विरूद्ध केलेल्या कृती/ खटले इत्यादींची माहिती बँक प्राथमिक विक्रेत्यांनी रिझर्व बँकेला दिली पाहिजे.
६) जर रिझर्व बँकेला असे वाटले की बँकेने पात्रतेच्या अटींची व कामाच्या दंडकांच्या अटींची पूर्तता केलेली नाही तर रिझर्व बँक अशा बँकांचा प्राथमिक विक्रेता अधिकार रद्द करण्याचा हक्क राखून ठेवते.

## ६.६ प्राथमिक विक्रेत्यासाठीचा अर्ज

प्राथमिक विक्रेता व्यवसायासाठी पात्र बँकांनी तत्वतः मान्यतेसाठी मुख्य महाप्रबंधक बँकिंग ऑपरेशन व विकास विभाग, रिझर्व बँक ऑफ इंडिया, मुख्य कार्यालय जागतील व्यापार केद्र, कफ परेड, मुंबई ४००००५ यांच्या कडे अर्ज करावा. त्यांच्या कडून तत्वतः मान्यता मिळाल्यावर बँकांनी त्यांच्या शाखेतर्फे प्राथमिक विक्रेता व्यवसाय करण्यासाठी अधिकार पत्र मिळवण्यासाठी मुख्य महाप्रबंधक अंतर्गत कर्ज व्यवस्थापन विभाग, रिझर्व बँक ऑफ इंडिया, १६ वा मजला, केद्र मुंबई ४००००१ यांना अर्ज करावा.

## ६.७ बँक प्राथमिक विक्रेत्यांना जारी केलेली मार्गदर्शक तत्वे लागू होणे.

१) बँक प्राथमिक विक्रेत्यांनी भारतीय प्राथमिक विक्रेता संघटना (पी.डी.ए.आय.) व फिक्स्ड इनकम मनी मार्केट ॲंड डेरिव्हेटिव्हज असोसिएशन ऑफ इंडिया (एफ.आय.एम.एम.डी.ए.) या संघटनामध्ये सामील व्हावे अशी अपेक्षा आहे व या संस्था प्रतिभूती बाजाराचे हित संबंध जपण्यासाठी जे नियम घालून देतील ते पाळले पाहिजेत.

२) रिझर्व बँकेचे कर्ज/नेट कॉल्स व नेट ओन्ड फंडस यावर आधारीत सरकारी प्रतिभूती व ट्रेझरी बिल्स यामध्ये किमान गुंतवणूक करण्याची जी अट आहे ती बँक प्राथमिक व्यवसायाला लागू नाही.

३) परिपत्रक क्रमांक आयडीएमडी क्र.३४२६/११.०१.०१ (डी)/२००५-०६ दिनांक मे ३,२००६ द्वारे 'व्हेन इशूड इन ट्रेड' या कारणासाठी बँक प्राथमिक विक्रेते हे प्राथमिक विक्रेते म्हणून गणले जातील.

४) कॉल/नोटीस/मुदत वित्त बाजार/आंतर कंपनी ठेवी, एफ.सी.एन.आर (बी) कर्जे/बाहय वाणीज्य कर्जे व इतर वित्त उद्गमासाठी बँकेला जी मार्गदर्शक तत्वे लागू आहेत ती बँक प्राथमिक विक्रेत्यांना लागू होतील.

५) बँकेची गुंतवणूक धोरण बदलून त्यामध्ये प्राथमिक विक्रेता व्यवसाय विक्रेत्याचा अंतर्भाव करावा. या धोरणा अंतर्गत बँकेने स्वीकारलेला प्राथमिक विक्रेता व्यवसाय हा सरकारी प्रतिभूतीमध्ये व्यवहार करणे, अंडररायटिंग करणे, सार्वजनिक उपक्रम, सार्वजनिक कंपन्या यामध्ये गुंतवणूक, वित्तीय संस्थांचे कर्ज रोखे, कर्मशियल पेपर्स, ठेवींची प्रमाणपत्रे, कर्ज म्युच्युअल फंड व स्थिर उत्पन्न देणा-या आणखी प्रतिभूती हा प्राथमिक विक्रेता व्यवसायाचा भाग धरला जाणार नाही.

## ६.८ हिशेब पुस्तके ठेवणे

**१)** बँकेने आपल्या विभागाद्वारे अंगीकारलेल्या प्राथमिक विक्रेता व्यवसाय आहे. सध्याच्याच बँकेच्या सबसिडरी जनरल लेजर खात्यातून चालवला जाईल. परंतु प्राथमिक विक्रेता व्यवसायासंबंधीत व्यवहारासाठी सध्याच्या बँकिंग व्यवसायापासून वेगळी अशी हिशेब पुस्तके आवश्यक त्या लेखापरीक्षा व्यवस्थेसह ठेवावी लागतील. कोणत्याही वेळी प्राथमिक विक्रेता व्यवसायासाठी किमान १०० कोटी रूपयांच्या सरकारी प्रतिभूती राखून ठेवल्या असतील.

२) बँक प्राथमिक विक्रेता व्यवसायाचे व्यवहार समावर्ती लेखा परीक्षेद्वारे (कंकरंट ऑडिट) तपासले जातील. बँकेने प्राथमिक विक्रेता व्यवसायासाठी ठरवलेली किमान १०० कोटी रूपयांची सरकारी प्रतिभूतींची रक्कम प्राथमिक विक्रेता लेखा पुस्तकात ठेवली आहे व बँक रिझर्व बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करीत आहे असा अहवाल रिझर्व बँकेच्या आयडीएमडी कडे दर तिमाहीला पाठवावा.

**७. <u>म्युच्युअल फंड व्यवसाय</u>**

१) म्युच्युअल फंडाचा व्यवसाय सुरू करण्याआधी बँकेने रिझर्व बँकेची पूर्व परवानगी ध्यावी. बँकेने प्रायोजित केलेल्या म्युच्युअल फंडांनी सेबीने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे.
२) बँकांनी प्रायोजित केलेल्या म्युच्युअल फंडानी आपल्या नावात प्रायोजक बँकेचे नाव वापरू नये. जिथे बँकेचे नाव फंडाबरोबर जोडले आहे तेथे नवीन योजना जाहीर करताना घोषित करणारे कलम जोडावे व त्यात असे नमूद करावे की योजनेच्या कामात काही तूट वा तोटा आल्यास बँक त्याला जबाबदार रहाणार नाही.
३) खालील अटी व शर्तीची पूर्तता करून बँका म्युच्युअल फंडाबरोबर त्यांचे विपणन करण्यासाठी करार करू शकतात.
अ) बँकांनी आपल्या ग्राहकांचे प्रतिनिधी म्हणून काम करावे. त्यांनी गुंतवणूकदारांचे युनिटचे खरेदी/विक्रीचे अर्ज म्युच्युअल फंडाकडे/त्यांच्या रजिस्ट्रार/ट्रान्सफर एजंटकडे पाठवतील. युनिटची खरेदी ही ग्राहकाच्या जोखमीवर व बँकेतर्फे परताव्याबाबत कोणत्याही त-हेची हमी देऊ नये.
ब) बँकांनी म्युच्युअल फंडांची युनिट सेकंडरी मार्केट मधून घेऊ नयेत.
क) बँकांनी म्युच्युअल फंडांची युनिट आपल्या ग्राहकांकडून विकत घेऊ नये.
ड) जर बँकांनी म्युच्युअल फंडच्या युनिटस वर ग्राहकांना कर्ज देण्याचे ठरवले तर त्या बाबतीत रिझर्व बँकेचे शेअर्स/कर्जरोखे किंवा म्युच्युअल फंडस्च्या युनिटस् वर कर्ज देण्याच्या बाबतीत ज्या सध्याच्या सूचना आहेत त्याचे पालन केले पाहिजे.
इ) ज्या बँका आपल्या खातेदारांची म्युच्युअल फंडांची युनिटस् आपल्या ग्राहकांतर्फे सुरक्षित ठेवतात, त्यांनी आपल्या गुंतवणुकी व ग्राहकांच्या गुंतवणुकी वेगवेगळया ठेवाव्यात.
फ) बँकांनी याबाबत पुरेसे व परिणाम कारक नियंत्रक उपाय योजना करावेत. यासाठी युनिटस्ची खरेदी विक्री काही शाखामध्येच मर्यादित ठेवावे.

**८. उपकंपन्याबरोबरील संबंध**

प्रायोजक बँकेने आपल्या उपकंपन्या/म्युच्युअल फंड याबरोबर व्यवसायाच्या काही बाबतीत जसे कर्ज घेणे/देणे यासाठीचा पैशांचा गैरफायदा घेणे/प्रतिभूतीची खरेदी/विक्री/ हस्तांतरण बाजार मूल्यांपेक्षा कमी दराने करणे, प्रतिभूती व्यवहाराला अधिक खास महत्व देणे, उपकंपनीला मदत/वित्तसहाय्य करण्याचा अतिरेक करणे. बँकेला शक्य नसताना किंवा परवानगी नसताना या बाबतीत सावधानतेचे धोरण ठेवावे. ग्राहकांना अर्थसहाय्य करणे. या बाबतीत सावधानतेचे धोरण ठेवावे. मुख्य बँकेचे पर्यवेक्षण हे उपकंपनी/म्युच्युअल फंडच्या रोजच्या व्यवहारात ढवळाढवळ करणारे असू नये. यासाठी बँकेने खालील उपाय योजावेत.
१) प्रायोजक बँकेच्या निदेशक मंडळाने उपकंपन्या/म्युच्युअल फंडाच्या कामाचा वेळोवेळी (उदा. सहा महिन्यातून एकदा) त्यात त्यांच्या कामकाजाच्या महत्वाचा भागाचा विचार करावा व जिथे सुधारण्यासाठी वाव आहे तेथे सूचना/मार्गदर्शक तत्वे घालून द्यावीत.
२) प्रायोजक बँकेने वेळोवेळी उपकंपन्या/म्युच्युअल फंडाच्या लेखापुस्तकांचे परीक्षण/तपासणी करावी व आढळलेल्या चुका त्वरित दुरूस्त केल्या जातील याची काळजी घ्यावी. जर बँकेचे कर्मचारी तपासणी/लेखापरीक्षा करू शकत नसतील. तर हे काम चार्टर्ड अकांउटंट फर्म (बाहेरच्या) द्यावे. जर त्यात काही अडचण आली (उदा. त्यासाठी उपकंपन्या वा मालमत्ता व्यवस्थापना कंपनीच्या घटनेमध्ये तरतूद नसणे) तर ती दूर करण्याची व्यवस्था करावी.
३) ज्या कंपन्यांनी वित्तीय सेवा देणा-या कंपन्यांमध्ये भाग भांडवलाद्वारे गुंतवणूक केली आहे, त्या कंपन्यांनी त्यांचा वर्षातून किमान एकदा आढावा घ्यावा.

**९. स्मार्ट/डेबिट कार्ड व्यवसाय**

सूची १ मध्ये दिलेली मार्गदर्शक तत्वे ध्यानात घेऊन बँका त्यांच्या निदेशक मंडळांच्या परवानगीने स्मार्ट/ऑन लाईन डेबिट कार्ड जारी करू शकतात. ज्या डेबिट कार्ड मध्ये अधिकार देणे व हिशेबाची पूर्ती या ऑफ लाईन असतात तेथे बँकेने रिझर्व बँकेची या गोष्टीसाठी पूर्वपरवानगी घ्यावी. त्यासाठी त्यांनी रिझर्व बँकेला अधिकार देण्याची व हिशेब पूर्तीची पद्धत वापरलेले तंत्रज्ञान, सेवा देणा-यांबरोबर केलेले करार, निदेशक मंडळाचा ठराव इत्यादी गोष्टी रिझर्व बँकेला सादर कराव्यात. ज्या बँकांचे निव्वल मूल्य (नेट वर्थ) रू.१०० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त आहे त्यांनीच ऑफ लाईन डेबिट कार्ड व्यवसाय करावा. गैर बँकिंग संस्थाबरोबर करार करून बँका स्मार्ट/डेबिट कार्ड जारी करू शकत नाही. बँकांनी स्मार्ट/डेबिट कार्डाच्या कामकाजाचा आढावा घ्यावा व निदेशक मंडळाला पुनरावलोकनासाठी दर सहा महिन्यांनी (उदा. प्रत्येक मार्च व सप्टेंबरच्या अखेरी) अहवाल सादर करावा. स्मार्ट/डेबिट कार्डाच्या व्यवहाराच्या आढाव्याचा असा अहवाल डिपार्टमेंट ऑफ पेमेंट अॅड सेटलमेंट सिस्टीमला सादर करावा व त्याची प्रत बँकिंग निरीक्षण विभागाच्या त्या त्या विभागीय कार्यालयाला दर सहा महिन्याने (प्रत्येक वर्षाच्या मार्च व सप्टेंबरच्या शेवटी) द्यावी. त्यात **सूची २** मध्ये विचारलेली माहिती द्यावी. बँकांनी डेबिट कार्ड वापरायच्या कामाला प्रोत्साहन द्यायच्या योजना रिझर्व बँकेच्या पूर्वपरवानगी विना अंमलात आणायला हरकत नाही. मात्र त्याच लॉटरी किंवा चान्स असता कामा नये.

**आधीच पैसे भरलेल्या कार्डबाबत बँकांनी डिपार्टमेंट ऑफ पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टीम, रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचे परिपत्रक क्रमांक डीपीएसएस. सी.बी.पी.डी. क्रमांक १८७३/०२, १४.०६.२००८-०९ दिनांक २७.४.२००९ मधील सूचनांचे पालन करावे.**

**१०. मनी मार्केट म्युच्युअल फंड (एम.एम.एम.एफ.)**

या सेबीच्या नियमाखाली येतात. परंतु ज्या बँका एमएमएमएफ सुरू करू इच्छितात त्यांनी हा व्यवसाय सुरू करण्यासाठी सेबीकडे नोदंणी करण्याआधी रिझर्व बँकेकडून आवश्यक पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

**११. मनी मार्केट म्युच्युअल फंडाच्या गुंतवणूकदारांसाठी धनादेश (चेक्स) लिहिण्याची सुविधा** ज्या बँका प्रामुख्याने मनी मार्केट उपकरणामध्ये (कॉपर्सच्या ८०% पेक्षा कमी नाही इतकी) गुंतवणूक करतात त्यांना (एमएमएमएफ व एमएफ बरोबर गिल्ट फंडस् व लिक्विड इनकम स्कीम मध्ये) व त्यांच्या गुंतवणूकदारांना धनादेश लिहिण्याची परवानगी आहे. मात्र त्यासाठी खालील काळजी घेणे आवश्यक आहे.

१) बँकेने स्थापित केलेल्या एमएमएमएफ बाबतीत प्रायोजक बँकेबरोबर करार केला पाहिजे. इतर बाबतीत निश्चित ठरवून दिलेल्या बँकेबरोबर करार केला पाहिजे. योजना जाहीर करणा-या पत्रकामध्ये बँकेचे नाव स्पष्टपणे आले पाहिजे.

२) योजना जाहीर करणा-या पत्रकामध्ये असा स्पष्ट उल्लेख असावा की धनादेश लिहिण्याची सवलत देणारा करार ही एमएमएमएमएफ/एसएफ व निश्चित ठरवून दिलेली बँक यांच्या मधील व्यापारी व्यवस्था आहे व त्यामुळे एमएमएमएफ/एमएफ च्या युनिटला सेवा पुरवणे ही त्या बँकेची प्रत्यक्ष जबाबदारी होत नाही. हे सर्व सार्वजनिक घोषणामध्ये व वैयक्तिक गुंतवणुकदारांना केलेल्या सर्व संपर्कात सांगितले गेले पाहिजे.

३) सदर व्यवस्था एका गुंतवणुकदाराला त्याच्या निवडीनुसार निश्चित ठरवलेल्या बँकेच्या एकाच शाखेत देण्यात येईल.

४) ही सवलत इतर खात्यापेक्षा निराळी, ड्रॉईंग खात्या सारखी असावी. त्यात किती चेक काढता येतील, किती रक्कम काढता येईल हे एमएमएमएफ/एमएफ ने ठरवल्याप्रमाणे असावी. मात्र ही सवलत नेहेमीच्या बँक खात्यानुसार नसावी व चेक तिस-या पक्षांच्या नावे न काढता गुंतवणूकदाराच्या नावे (दिलेले वचन पाळण्याचा एक भाग म्हणून) असावे. या खात्यात ठेवी ठेवता येत नाही. यातून काढलेली प्रत्येक रक्कम ही एमएमएमएफ/एमएफ च्या पूर्ति व अटीनुसार असली पाहिजे व त्यातील होल्डींगची वचनपूर्तीला (रिडंम्पशन) म्हणून मानली जाईल.

५) ही सवलत एमएमएमएफ मधील गुंतवणुकीच्या किमान १५ दिवसाचा कुलुपबंद कालखंड संपल्यावरच मिळेल. (मात्र हा नियम पात्र अशा म्युच्युअल फंडाच्या गिल्ट फंडस व लिक्वीड इनकम स्कीम लागू होत नाहीत कारण या बाबतीत सेबीचे नियम लागू होत नाहीत)

६) एमएमएमएफ/एमएफ ने या ड्रॉईंग खात्यात पुरेसे पैसे आधीच भरलेले आहेत यांची बँकेने खात्री करून घ्यावी व पैशांची स्थिती रोजच्या रोज पहावी.

७) बँकेला आणखी योग्य वाटतील त्या उपाय योजना

## १२. बँकांचा विमा व्यवसायात प्रवेश

बँकिंग नियंत्रण कायदा १९४९ च्या कलम ६(१)(०) नुसार भारत सरकारने ३ ऑगस्ट २००० रोजी जारी केलेल्या सूचना पत्रकानुसार बँका 'विमा' हा व्यवसाय म्हणून करू शकतात असे घोषित केले. त्यानुसार बँकांना असे आदेश दिले गेले की ज्या बँका सूची ३ मधील मार्गदर्शक तत्वांनुसार विमा व्यवसाय करू इच्छितात त्यांनी रिझर्व बँकेची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे बँकांनी रिझर्व बँकेला पूर्ण माहिती देणारे अर्ज करावेत. या अर्जामध्ये सहकार्य प्रकल्पात (जॉईंट व्हेंचर) बँक किती भाग भांडवल घेणार आहे बँक विमा व्यवसायासाठी कोणत्या कंपनीबरोबर करार करणार आहे ते लिहावे. सोबत आवश्यक तो निदेशक मंडळाचा ठराव व टिपण असावे व त्यात बँकेच्या प्रस्तावाचे मूल्यमापन करणारा अहवाल व प्रस्ताव मान्य केल्याचा ठराव लावावा. मात्र बँकांना आपल्या खात्याद्वारे विमा व्यवसाय करायला अनुमती नाही. तसेच जर बँक **सूची ४** मध्ये दिलेल्या अटी पाळून कोणतीही जबाबदारी न घेता एकाद्या विमा व्यवसाय किंवा संदर्भ व्यवस्था करणार असेल तर रिझर्व बँकेची पूर्व परवानगी घ्यावी लागत नाही.

## १३. बँका द्वारे पेन्शन फंडचे व्यवसाय

बँकिंग नियंत्रण कायदा १९४९ च्या कलम ६(१) (०) खाली दिलेल्या अधिकारानुसार भारत सरकारने जारी केलेल्या अधिसूचना क्रमांक फ.क्र.१३/६/२००५ बी.ओ.ए. दिनांक २४ मे,२००७ नुसार बँकिंग कंपनी पेन्शन फंड मॅनेजर या व्यवसायात कार्य करू शकते. त्यानुसार बँकांना असे आदेश दिले आहेत की त्या या कारणासाठी स्थापन केलेल्या उपकंपन्यांद्वारे हा व्यवसाय करू शकतात.

त्यांनी त्यासाठी पी.एफ.आर.डी.ए. ने ठरवलेल्या अटी व शर्तीचा पूर्तता केली पाहिजे. हा व्यवसाय बँकेने आपल्या खात्याद्वारे अंगीकारता नये. हा व्यवसाय सुरू करू इच्छिणा-या बँकांनी **सूची ५** मधील असलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार डिपार्टमेंट ऑफ बँकिंग ऑपरेशन व डेव्हलपमेंट, रिझर्व बँक ऑफ इंडिया, वर्ल्ड ट्रेड सेंटर-१ मुंबई-४००००५ येथे अर्ज करावा. त्यासाठी **सूची ५** मध्ये दिलेल्या पात्रतेच्या सर्व निकाषी बाबतचे सर्व तपशील द्यावेत. त्यामध्ये उपकंपनांच्या भाग भांडवलाचा किती हिस्सा बँक घेणार ते हे नमूद करावे. त्याचप्रमाणे सदर प्रस्ताव पारित करून बँकेचा प्रस्ताव व प्रस्ताव कसा व्यवहार्य आहे त्याचा सविस्तर अहवाल, निदेशक मंडळापुढे सादर केलेले संबंधित विषयाचे टाचण व मंडळाचा ठराव हे ही रिझर्व बँकेला पाठवावेत.

## १४. कंपन्यांच्या समभागांचे व रोख्यांचे अंडटरायटिंग

सर्वसाधारणपणे बँकांनी समभागांचे व रोख्यांचे अंडररायटिंग करावे अशी त्यांच्याकडे मागणी केली जाते. अशा त-हेच्या अंडररायटिंगचा अतिरेक होऊ नये यासाठी खाली दिलेली मार्गदर्शक तत्वे कटाक्षाने पाळली जावीत.

१) कोणत्याही कंपनीचे शेअर्स हे कर्जवाटणी तारण म्हणून किंवा मालक म्हणून स्वीकारण्याबाबत बँकिंग नियंत्रण कायदा कलम १९(२) व (३) मध्ये दिलेल्या तरतुदींचे कटाक्षाने पालन झाले पाहिजे.

२) बँकांनी ज्या शेअर्सच्या प्राथमिक इशू, किंवा परिवर्तनीय कर्जरोख्यांचा इशू, किंवा शेअर्सचे प्राधान्य असलेले म्युच्युअल फंडयांच्या इशू बाबत ज्या जबाबदा-या घेतलेल्या आहेत, त्या भांडवल बाजारात बँकेने किती भाग घ्यायचा या ठरलेल्या मर्यादेच्या आत आहेत याची खात्री करावी. परंतु १६ एप्रिल, २००८ पासून बँकांनी आपले भांडवल बाजारात घेतलेला भाग एकटयाने किंवा अनेकांनी मिळून किती आहे हे शोधून काढण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या अंडररायटिंग जबाबदा-या, त्यांच्या उपकंपन्यांच्या अंडररायटिंग जबाबदा-या बुक रनिंग प्रोसेस मधून वगळल्या तरी चालतील. याबाबतच्या परिस्थितीचा नंतर आढावा घेतला जाईल.
अ) वरील बाबतीतील दंडक ठरवण्यासाठीच्या मुख्य परिपत्रकानुसार एकटयाने कर्जदाराबाबत किंवा कर्जदारांच्या गटाबाबत काय तरतूद केली आहे हे ठरवण्यासाठी कोणत्याही कंपनीने किती अंडररायटिंग जबाबदारी (भागी) घेतलेली आहे ते लक्षात घेतले पाहिजे.
ब) बँकांनी स्वतःच्या खात्यावर इशू कलंडू नये (डिव्हॉल्व्ह) म्हणून प्रत्येक इशूचे सब अंडररायटिंग करावे हे सक्तीचे नाही. असे करावे की नाही हे बँकेने आपल्या तारतम्याने ठरवावे.
क) अंडररायटिंगची जबाबदारी स्वीकारताना बँकेने प्रत्येक प्रस्ताव काळजीपूर्वक तपासावा आणी त्या प्रस्तावाला जनतेचा पुरेसा प्रतिसाद मिळेल व इशू कलंडण्याची (डिव्हॉल्व्ह होण्याची) शक्यता कमी आहे याची खात्री करून घ्यावी.

ड) आपल्या पोर्टफोलिओमध्ये वेगवेगळया त-हेच्या गुंतवणुकी आहेत व आपण एकाच कंपनीच्या/कंपनीच्या गटाच्या शेअर्सच्या अंडररायटिंगची जबाबदारी स्वीकारली नाही याची बँकांनी खात्री करून घ्यावी.

बँकांनी इतर अंडररायटर्सची व जबाबदारी पार पाडण्याच्या त्यांच्या क्षमतेची चौकशी करावी.

३) बँकांनी कोणत्याही कंपनीच्या वा किंवा प्राथमिक विक्रेत्याच्या कमर्शियल पेपरचे अंडररायटिंग करू नये.

४) कंपन्यांनी जारी केलेल्या लघुमुदतीचे तरंगत्या दराच्या नोटस्/कर्जरोख/बॉडस् यांना रिव्हालव्हींग अंडररायटिंग सुविधा देऊ नये.

५) वर्षभरात केलेल्या अंडररायटिंग कामाचा आढावा घ्यावा. त्यामध्ये कंपनीवार अंडररायटिंग बँकेवर डिव्हॉल्व्ह झालेले शेअर्स/डिबेंचर्स, शेअर्सची दर्शनी किंमत व बाजारी किंमत लक्षात घेऊन डिव्हॉल्व्ह झालेल्या शेअर्स वरील (झालेला किंवा अपेक्षित) तोटा, मिळवलेले अंडररायटिंग कमिशन इत्यादीचा आढावा आर्थिक वर्ष पूर्ण झाल्यावर दोन महिन्याच्या आत निदेशक मंडळाला सादर करावा.

६) बँकांनी/बँकांच्या मर्चंट बँकिंग उपकंपन्यानी अंडररायटिंगचे व्यवहार करताना सेबी (अंडररायटर्स) नियम व अटी १९९३ व वेळोवेळी जारी केलेले नियम यांची पूर्तता झाली पाहिजे.

**१५. सार्वजनिक उपक्रमांच्या कर्जरोख्यांचे अंडररायटिंग**

सार्वजनिक उपक्रमांचे कर्जरोखे जारी करण्याबाबत बँका त्यांचे अंडररायटिंग करून महत्वाची भूमीका निभावू शकते. या अंडररायटिंगसाठी आलेल्या प्रस्तावांची बँकेने सर्व संबंधित घटक ध्यानात घेऊन योग्य ती छाननी करावी व त्यासाठी योग्य कारणे असलेले व्यापारी निकष लावावेत. त्यानंतर सक्षम अधिका-यांची अनुमती घ्यावी. सार्वजनिक उपक्रमांच्या कर्जरोखात गुंतवणूक करणे वा त्यांचे अंडररायटिंग करणे यासाठी बँकेने आपली अंतर्गत मार्गदर्शक तत्वे, व दंडक व धोरण ठरवावे. धोरणाला निदेशक मंडळाची संमती असावी. एकाच सार्वजनिक उपक्रमाच्या कर्जरोख्यात जास्त गुंतवणूक टाळावी.

बँकांनी सार्वजनिक उपक्रमांच्या कर्जरोख्यांचे अंडररायटिंग करण्याच्या व्यवसायाचा वर्षातून एकदा आढावा घ्यावा. त्यामध्ये प्रत्येक सार्वजनिक उपक्रमांत किती अंडररायटिंग केले किती कर्जरोखे बँकेवर कलंडले (डिव्हॉल्व्ह झाले) अन कर्जरोखे डिव्हॉल्व्ह झालेले घेतल्यामुळे किती तोटा (त्यांचे बाजारमूल्य व दर्शनीमूल्य ध्यानात घेऊन) किंवा अपेक्षित तोटा झाला, अंडररायटिंग करून किती कमीशन मिळाले ही सर्व माहिती आर्थिक वर्ष संपल्यावर दोन महिन्यात निदेशक मंडळासमोर सादर करावी.

**१६. 'सेफ्टी नेट' योजना**

काही बँका/त्यांच्या उपकंपन्या 'सेफ्टी नेट' योजनेच्या नावाखाली त्यांचा मर्चंट बँकिंग कामाचा एक भाग म्हणून काही सार्वजनिक इशूबाबत पुनः खरेदी सुविधा देत आहेत असे रिझर्व बँकेच्या ध्यानात आले आहे. अशा योजनांमध्ये इशू करतानाचा मूळ रोखे घेण्या-याकडून ठरावीक किमतीला ते ठरावित वेळेला परत विकत घ्यायचे बँक/उपकंपनी मान्य करते. मग त्यावेळी त्या रोख्यांची बाजारातील किंमत कितीही असो.

काही बाबतीत ज्यांचे रोखे अंडररायटिंग केलेले आहेत, त्यांची विनंती आली नाही तरी बँक स्वतःहूनच देऊ करते. वरकरणी असे रोखे घेण्याचे खरेदीदारीनी कोणतेही दायित्व स्वीकारलेले नसते. अशा योजनामध्ये धोका किंवा फायदा तोटा लक्षात घेतल्यावर मिळकत नसते कारण अशा योजनामध्ये रोखे खरेदी करणारा त्या रोख्यांची बाजारातील किंमत ठरलेल्या किमतीच्या खाली पडेल तेव्हाच या योजनांचा फायदा घेईल. त्यामुळे बँका/त्यांच्या उपकंपन्यांना असे आदेश दिले आहेत की त्यांनी अशा योजना कोणत्याही नावाने देऊ करू नयेत.

**१७. रेफरल सेवा**

आर्थिक प्रॉडक्टसाठी बँकांनी त्यांच्या ग्राहकांसाठी संदर्भ सेवा देण्याला हरकत नाही. मात्र त्यासाठी खालील अटींचे पालन करणे आवश्यक आहे.

१) बँक किंवा आर्थिक प्रॉडक्ट देणा-या तिस-यापक्षाने ज्या संस्था/व्यक्तींच्या बाबतीत संदर्भ सेवा दिली असेल त्यांच्या बाबतीत केवायसी/एएमएल मार्गदर्शक तत्वांचे कटाक्षाने पालन केले पाहिजे.

२) आर्थिक प्रॉडक्ट देणाचा तिस-या पक्षाची निवड अशा त-हेने करावी की संदर्भ देताना बँकेच्या इभ्रतीला धक्का पोचण्याच्या धोक्याची काळजी घेतली जाईल याची बँकेने खात्री करून घ्यावी.

३) बँकेने सुरूवातीलाच हे स्पष्ट करावे की बँक केवळ संदर्भ सेवाच देत आहे व कोणत्याही त-हेची जोखीम स्वीकारायची बँकेची तयारी नाही.

४) आर्थिक प्रॉडक्ट जारी करणा-या तिस-या पक्षाने त्यांना लागू असलेल्या नियंत्रणात्मक मार्गदर्शक तत्वे पाळावीत

५) संदर्भ सेवा देताना बँकेने रिझर्व बँकेची मार्गदर्शक तत्वे पाळावीत.

**१८. कमिशन्स/मानधनांचे जाहिरीकरण**

या पत्रकातील अटिंच्या परिच्छेद ७मध्ये, बँकांना काहि विशिष्ठ अटि आणि नियमांच्या अन्वये म्युच्युअल फंडांचे विपणन करण्यासाठी म्युच्युअल फंडांच्या सोबत करारबध्द होण्याचा सल्ला दिला जातो. त्याचप्रमाणे, यापत्रकाच्या परिच्छेद १२ प्रमाणे, बँकांना खालील बाबतीत आर बी आयची पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता नसते.

विमा एजन्सी व्यवसाय किंवा कोणत्याहि जोखमीत सहभागी झाल्याशिवायचा संदर्भ करारनामा , जो या पत्रकातील परिशिष्ठ ४ मध्ये दिलेल्या अटिंच्यानुसार असेल. बँकांना या पत्रकाच्या परिच्छेस १७च्या अन्वये आपल्या अशिलांना काहि अटिंच्या अंतर्गत आर्थिक उत्पादनांसाठी जोखमीत सहभागी न होता शुध्द स्वरुपातील संदर्भ सेवा देण्याची मुभा दिली जाते. वरील मुद्द्यांच्या अतिरीक्त,बँका आपल्या अशिलांना स्वनिर्णयगत नसणारी गुंतवणुक सल्ला सेवा देखील उपलब्ध करुन देऊ शकतात, त्यासाठी प्रत्येक व्यवहारागणिक मंजुरी दिली जाते.

काहि स्थितींमध्ये बँकांना स्वनिर्णयगत सूचीबध्द (पोर्टफोलियो) व्यवस्थापन सेवा, त्यांच्या सहयोगी संस्थांमार्फत काहि अटिंवर देण्याची मुभा दिली जाते. वरील सर्व कृतींचा संदर्भ घेता बँका विपणन/संदर्भ देणे, विविध म्युच्युअल फंड/विमा/वित्त सेवा कंपन्यांच्या विविध स्पर्धात्मक उत्पादनांना आपल्या अशिलांना उपलब्ध करुन देतात. ह्या उत्पादनांना विकताना/संदर्भ देताना अशिलांच्या हिताच्या पारदर्शकतेचा विचार करता, बँकांना आपल्या अशिलांना म्युच्युअल फंड/विमा/इतर वित्तसेवा कंपन्यांच्या विपणनासाठी/उत्पादनांचा संदर्भ देण्यासाठीच्या सर्व कमिशन्स/मिळवल्या जाणाऱ्या इतर शुल्कांच्या (कोणत्याही स्वरुपातील)माहितीला उघड करण्याचा सल्ला दिला जातो. जेव्हा बँक एक म्युच्युअल फंड/विमा कंपनीचे विपणन/वितरण/उत्पादनांचा संदर्भ देत असल्याच्या स्थितीत, या जाहिरीकरणाची आवश्यकता भासते.

२. बँकांच्या वित्तीय विवरणांच्या पारदर्शकतेला वाढविण्यासाठी बँकांमार्फत आपल्या ताळेबंदामध्ये खात्यांच्या टिपांच्या जाहिरीकरणाच्या आवश्यकतेला रिजर्व बँकेने आपल्या पत्रकांच्या वितरणामार्फत वेळोवेळी जाहिर केले आहे. परदर्शकता वाढविण्याचे पुढचे पाऊल म्हणजे, असा निर्णय घेण्यात आला कि बँकांनी ३१मार्च २०१०च्या शेवटापासुन खात्यांच्या टिपांचे, तसेच त्यांच्या मार्फत हाताळलेल्या बँकहमी व्यवसायाच्या संदर्भामध्ये शुल्क/मिळालेल्या मानधनांची माहितीचे जाहिरीकरण करणे गरजेचे आहे.

**सूची-१**
**(परिच्छेद ९)**

**बँकांनी जारी केलेल्या स्मार्ट कार्ड/डेबीट कार्डा बद्दल मार्गदर्शक तत्वे**

**१. अंतर्भाव**

खालील पैकी कोणतेही कार्य करणा-या स्मार्ट कार्ड/डेबीट कार्डाला ही मार्गदर्शक तत्वे लागू होतात.

- कार्डाचा वापर असलेले इलेक्ट्रॉनिक पेमेंट विशेषतःच्या विक्रीच्या ठिकाणी वा अन्यत्र कार्डाचा वापर करण्यासाठी उपकरण/यंत्र ठेवले आहे.

- रोख पैसे देणारी यंत्रे, व कोणत्याही वेळेला चालू असलेली यंत्रे या द्वारे नोटांच्या स्वरूपात पैसे काढणे व भरणे वा चेक्स भरणे.

- कोणीतरी आधी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पैसे दिलेले आहेत, असे कार्ड वा कार्डाचे कार्य, अशा पैकी काही आणखी पैसे भरता येईल असे कार्ड किंवा असे कार्य जे खाते दाराच्या खात्यावर (ऑन लाईन) त्या खात्यातून पैसे देता येतील वा अनेक त-हेच्या कारणासाठी वापरले जाणारे कार्ड

**२. रोख पैसे काढणे**

बँकिंग नियंत्रण कायदा कलम २३ नुसार रिझर्व बँकेच्या पूर्व परवानगीविना विक्रीच्या जागी स्मार्ट/डेबिट कार्डचा वापर करून रोखीचे कोणतेही व्यवहार (रोख पैस काढणे/भरणे) करता येणार नाहीत.

**३. ग्राहकांची पात्रता**

ज्या ग्राहकीची आर्थिक पत उत्तम आहे त्या ग्राहकांना बँक स्मार्ट (ऑन लाईन वा ऑफ लाईन) वा ऑन लाईन डेबिट कार्ड देऊ शकेल मग ते ग्राहक बँकेचे सहा महिन्यापेक्षा कमी काळासाठी ग्राहक असले तरी, मात्र त्यासाठी बँकेने परिपत्रक क्रमांक डीबीएसएफव्हीजी.बीसी.५६/२३.४.००१ /९८-९९ दिनांक २१.६.९९ या द्वारे पाठवलेल्या मोठया किमतीच्या बँक अफरातफरीच्या अहवालाच्या परिच्छेद क्रमांक ९.२ नुसार ''आपले ग्राहक ओळखा'' या योजनेची अंमल बजावणी केली असली पाहिजे. परंतु ज्या बँका ऑफ लाईन डेबीट कार्ड देतात त्यांनी ग्राहकांचे खाते किमान सहा महिन्यासाठी समाधानकारकरीत्या चालण्याचा दंडक पाळला पाहिजे. ज्या व्यक्ती, कंपन्या व फर्म यांच्या खात्यामधील तरलता असलेल्या बचत खाते/चालू खाते/मुदत ठेव खाते यांना बँका स्मार्ट कार्ड/डेबिट कार्ड सुविधा देऊ शकतात. कॅश क्रेडीट/कर्ज खात्यांना हया सुविधा देऊ नयेत. मात्र ज्या वैयक्तीक कर्ज खात्यावर चेक द्वारे व्यवहार करण्याची अनुमती आहे त्यावर ऑन लाईन डेबिट कार्ड सुविधा देता येईल.

**४. देयत्वाला वागणूक (ट्रीटमेंट ऑफ लायबिलीटी)**

स्मार्ट/डेबिट कार्डामध्ये उरलेल्या न खर्च केलेल्या (आउट स्टँडिंग) रकमा या गंगाजळीचा हिशेब करण्यासाठी वापरता येतील. अहवालाच्या दिवशी किती रक्कम बँकेच्या हिशेब पुस्तकात शिल्लक आहे त्यावर ही परिस्थिती ठरेल.

**५. व्याज देणे**

ज्या स्मार्ट कार्डामध्ये साठवलेली किंमत आहे (स्मार्ट कार्डाच्या ऑफ लाईन व्यवहारात) त्या स्मार्ट कार्डाला हस्तांतरीत केलेल्या शिलकेवर व्याज दिले जाणार नाही. ऑन लाईन स्मार्ट कार्ड किंवा डेबिट कार्ड बाबत बँकिंग नियंत्रण कायदा १९४९ च्या कलम २१ व ३५ अ नुसार बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या व्याज दराच्या आदेशानुसार व्याज द्यावे.

**६. सुरक्षितता आणि इतर गोष्टी**

अ) बँक स्मार्ट कार्डच्या सुरक्षितेतीची पूर्ण खात्री करून घेईल. कार्डाची सुरक्षितता ही बँकेची जबाबदारी आहे व सुरक्षिततेच्या यंत्रणेच्या भंगामुळे किंवा यंत्रणा काम न करण्यामुळे झालेल्या तोटयाला बँक जबाबदार असेल.

ब) क्रेडीट/डेबिट कार्ड ऑन लाईन वापरतानाचे सुरक्षिततेचे प्रश्न व धोका कमी करण्याचे उपाय याबाबत डिपार्टमेंट ऑफ पेमेंट अँड सिक्युरिटी सिस्टीम रिझर्व बँकेने जारी केलेल्या परिपत्रक क्रमांक आरबीआय/डीपीएसएस क्रमांक १५०१/०२.१४.००३/२००८-०९ दिनांक १८.२.२००९ द्वारे जारी केलेले परिपत्रक पहावे.

१. अतिरीक्त अधिकृतता पुरवणाऱ्या यंत्रणेच्या अन्वये/ आय वी आर व्यवहारांच्या व्यतिरीक्त सर्व ऑनलाईन कार्डांसाठी व्यवहार सादरीकरण होणार नाही माहितीवर आधारीत वैधता कार्डावर दिसणार नाही. बँकांना पत्रक क्र. RBI/DPSS No. dated April 23, 2010 मार्फत असा सल्ला दिला जातो की, अतिरीक्त अधिकृतता/व्यवहारांना सादरन करण्याची सर्व कार्डांची वैधता १ जानेवारी २०११पासुन आय व्ही आर व्यवहारांपर्यंत वाढविण्यात यावी. आमच्या दिनांक ३१ डिसेंबर २०१०च्या पत्रक क्र. DPSS.CO.No. 1503/02.14.003/2010-11 नुसार बँकांना ३१ जानेवारी २०११पर्यंत एका महिन्यासाठी नवीन कराराच्या समांतर चलनाची मुभा दिली जाते. परंतु ३१ जानेवारी २०११ नंतर अतिरीक्त घटक अधिकृतता आवश्यकतेची पूर्तता झाल्याखेरीज कोणत्याही आय व्ही आर व्यवहाराला परवानगी दिली जाणार नाही.

२. सर्व कार्ड नॉट प्रेजेंटच्या सर्व कार्डधारकांसाठी ऑनलाईन ॲलर्टची सुविशा रु.५००० आणि वरच्या व्यवहारांसाठी करण्यात येईल.

पत्रक क्र. DPSS.CO.PD.2224/02.14.003/2010-11 dated March 29, 2011 नुसार बँकांना विविध माध्यमांमधील कार्डांच्या उपयोगाचा आंतर्भाव करीत कोणत्याही रकमेच्या सर्व प्रकारच्या व्यवहारांसाठी ऑनलाईन ॲलर्ट्सची यंत्रणा सुरु करण्यासाठी योग्य ती पाऊले उचलण्याचा सल्ला दिला जातो. या उपाययोजना ३० जुन २०११पासुन लागु केल्या जातील.

क) कोणत्याही ग्राहकाला त्याने विनंती केलेली नसताना कार्ड पाठवू नये. मात्र हा नियम आधी असेलेल्या कार्डाच्या ऐवजी दुसरे कार्ड द्यायचे असेल तर हा नियम लागू नाही.
ड) प्रत्येक व्यवहार तपासून चुका दुरूस्त करण्यासाठी बँकांनी पुरेसा काळ अभिलेख (रेकॉर्ड) जपून ठेवावेत. (यासाठी कालबाहय झालेल्या बाबींसंबंधीचा मर्यादेचा कायदा ध्यानात घ्यावा).
इ) कार्ड धारकाचा व्यवहार पूर्ण झाल्यावर त्याला त्याचा लिखीत अभिलेख (रेकॉर्ड) द्यावे. हे त्वरित पावतीच्या स्वरूपात द्यावे किंवा नेहेमीच्या बँक स्टेटमेंटच्या स्वरूपात द्यावा.
फ) कार्ड हरवल्यास, त्यांची चोरी झाल्यास किंवा कार्डाची कॉपी झाल्यास होणारा तोटा ते बँकेला कळवे पर्यंत विशिष्ट प्रमाणात कार्ड धारक सोसेल. (बँकेने व ग्राहकाने आधीच्या ठरवलेल्या प्रमाणात व्यवहाराच्या ठरलेले टक्के किंवा ठराविक रक्कम). मात्र जर कार्डधारकाने अफरातफर केली असेल, किंवा जाणूनबूजून एखादी गोष्ट केली असेल किंवा आत्यंतिक निष्काळजीपणे तो वागला असेल तर हा नियम लागू होत नाही.
ग) ग्राहकांना कार्ड चोरीला गेल्याचे, हरवल्याचे किंवा त्याची कॉपी काढल्याचे बँकेला २४ तासात केंव्हाही कळवता यावे यासाठी बँकेने योग्य यंत्रणा निर्माण करावी.
ह) अशी सूचना मिळाल्यानंतर कार्डाचा पुढील वापर थांबवण्यासाठी बँक योग्य ती कारवाई करेल.

**७. कार्ड जारी करण्याच्या अटी व शर्ती**

बँक व कार्ड धारक यांच्यातील संबंध करारानुसार असतील, अशा परिस्थितीत
अ) प्रत्येक बँक कार्ड धारकाला कराराच्या अटी व शर्ती तसेच कार्ड वापरायच्या अटी व शर्ती लेखी देईल. त्यामुळे दोन्ही पक्षांच्या हितसंबंधाची काळजी घेतली जाईल.
ब) या अटीचा स्पष्टपणे उल्लेख केला जाईल.
क) कोणत्या पायावर शुल्क आकारले जाईल हे या अटींमध्ये असेल पण शुल्काची नक्की रक्कम असेलच असे नाही.
ड) बँक या अटींमध्ये बदल करू शकते, पण कार्ड धारकाला त्याची पुरेशी सूचना द्यावी लागेल की जेणे करून तो त्याला वाटल्यास आपले कार्ड काढून घेऊ शकेल.
इ) काही काळ ठरवला जाईल व त्यानंतर त्या कार्ड धारकाने कार्ड रद्द न केल्यास बँकेच्या अटी व शर्ती मान्य केल्या आहेत असे समजले जाईल.
फ) १) या अटीनुसार कार्ड धारकावर कार्ड, व ते वापरण्याच्या पद्धती (पिन किंवा कोड) सुरक्षित ठेवायची जबाबदारी येते.
२) या अटीनुसार कार्ड धारकावर पिन किंवा कोड लिहून किंवा रेकॉर्ड करून न ठेवण्याची जबाबदारी येते की जेणे करून तो तिस-या पक्षाला कळू शकेल.
३) या अटीनुसार खालील परिस्थितीत कार्ड धारक बँकेला त्वरीत सूचना देईल

- कार्ड किंवा ते वापरण्याची पद्धत हरवली
- कार्ड धारकाच्या खात्यावर अनधिकृत व्यवहार झाले तर
- बँकेकडून त्या खात्याच्या व्यवहारामध्ये काही चूक किंवा अनियमीतपणा इत्यादि झाले तर

४) या अटीमध्ये कोठे संपर्क साधायचे हे कळवले असेल. हा संपर्क दिवस किंवा रात्र यापैकी केंव्हाही कोणत्याही वेळेला साधता येईल.

५) या अटीनुसार कार्ड धारकावर अशी जबाबदारी येते की त्याने कार्डने दिलेली कोणतीही आज्ञा बदलून रद्द करू नये.

ग) या अटीनुसार बँक पिन किंवा कोड जारी करताना काळजी घेईल व तो कार्ड धारकाखेरीज कोणालाही कळू देणार नाही.

ह) या अटीनुसार बँकेच्या ताब्यात असलेल्या यंत्रणा काम न केल्यामुळे कार्ड धारकाचा तोटा झाला तर बँक त्याला जबाबदार असेल. पण जर पैसे देणारी यंत्रणा काम करत नाही असा संदेश यंत्रावर आला किंवा अशी सूचना अन्य मार्गाने ग्राहकाला मिळाली आणी तांत्रिक बिघाड झालेला असला तर बँक त्याला जबाबदार असणार नाही. व्यवहार न होऊ शकल्यास ग्राहकाच्या होणा-या तोटयाची बँकांची जबाबदारी मूळ मुद्दलापुरती मर्यादित व व्याजाचे नुकसान भरून देण्याची जबाबदारी अटी व शर्तीवर अवलंबून असते.

८. पूर्वप्रदान झालेल्या कार्डाबद्दल बँकांनी पूर्वप्रदान कार्डाबद्दल डिपार्टमेंट ऑफ पेमेंट ॲड सेटलमेंट सिस्टीम रिझर्व बँक ऑफ इंडिया यांनी परिपत्रक क्रमांक डीपीएसएस.सीओ.पीडी. नं.१८७३/०२.१४.०६/२००८-०९ दिनांक २४ एप्रिल,२००९ या द्वारे दिलेल्या सूचनांचे अवलोकन करावे.

**सूची-२**<br>**(परिच्छेद ९)**

**स्मार्ट/डेबीट कार्ड जारी करणे व त्यांचा वापर यांच्या अहवालाचे स्वरूप**

१. बँकेचे नाव

२. अहवालाचा कालखंड

३. हार्डवेयर भागासह कार्डाचा प्रकार (आय.सी.चिप.) चुंबकीय पद्धत सी.पी.यु. मेमरी

४. वापरलेल्या सॉफ्टवेअरचा प्रकार

५. स्मार्ट कार्डमधुन देऊ केलेल्या प्रॉडक्टची संख्या

६. रक्कम साठवण्यावरील मर्यादा

७. री-लोड करण्याची वैशिष्टये

८. अमलात आणलेल्या सुरक्षिततेच्या उपाय योजना

९. सेवा प्रदान (स्वतःच किंवा दुसरा कोणी)

१०. स्मार्ट कार्ड वापरता येईल अशी एकूण केंद्र

अ) पीओएस टर्मिनल    ब) व्यापारी संस्था

क) एटीएम    ड) इतर (स्पष्ट करा)

११. एकूण जारी केलेली कार्डे

अ) बचत खात्यावर    ब) चालू खात्यावर

क) तंरगत्या (फ्लोट खात्यावर)

१२. स्मार्ट कार्डमध्ये साठवलेली शिल्लक रक्कम (अहवालाच्या दिवशी)

१३. स्मार्ट कार्डमधून खर्च न केलेली रक्कम (अहवालाच्या दिवशी)

१४. त्या काळातील एकूण व्यवहार

१५. व्यवहारातील रक्कम

१६. व्यवसायाची पूर्तता करण्याची पद्धत

अ) ऑन लाईन    ब) ऑफ लाईन

१७. त्या काळातील अफरातफरीच्या घटना

अ) संख्या

ब) रक्कम

क) बँकेला झालेला तोटा

ड) ग्राहकांना झालेला तोटा

**सूची-३**
**(परिच्छेद १२)**

**बँकांचा विमा व्यवसायात प्रवेश**

१. कोणत्याही सूचीकृत बँकेला विमा कंपन्यांचे प्रतिनिधी म्हणून कोणत्याही जोखमीत सामील न होता विमा व्यवसाय करायला परवानगी आहे. बँकांच्या उपकंपन्यांनाही विमा उत्पादने वाटपाचे काम प्रतिनिधी तत्वांवर करायला परवानगी आहे.

२. ज्या बँका खालील पात्रतेच्या निकषांची पूर्तता करतात त्यांना जोखीम पत्करून विमा व्यवसाय सुरू करायला सहकंपनी (जॉईट व्हेंचर) स्थापन करायला परवानगी देता येईल. मात्र त्यांना काही सुरक्षिततेच्या उपाय योजना कराव्या लागतील. अशा सहकंपन्यात बँका त्या कंपनीच्या भरलेले भाग भांडवलाच्या (पेडअप कॅपिटल) जास्तीत जास्त ५०% समभाग घेऊ शकते. निवडक तत्वांवर रिझर्व बँक सुरूवातीला अधिक भाग भांडवल घ्यायला अनुमती देऊ शकेल व ठरलेल्या काळात समभागांची विक्री केली जाईल (खालील टीप १ पहा)
सहकंपन्यात भाग घेण्यासाठी पात्रतेचे निकष खालील प्रमाणे आहेत :

१) बँकेचे निव्वळ मूल्य (नेटवर्थ) रू.५००/- कोटी पेक्षा कमी नसावे
२) बँकेचा सीआरएआर १०% पेक्षा कमी नसावा
३) उत्पन्न न देणारी मालमत्ता (नॉन परफॉर्मिंग ॲसेटस) हे योग्य प्रमाणात असावेत.
४) गेल्या तीन वर्षात बँकेला निव्वल नफा मिळवलेला असावा
५) बँकांच्या उपकंपन्यांचे कामकाज समाधानकारक असावे.

३. ज्या ठिकाणी विमा नियंत्रण आणी विकास अधिकारी/विदेश गुंतवणूक प्रोत्साहन मंडळाच्या परवानगीने परदेशी कंपनी समभागाच्या २६% रक्कम गुंतवते तेंव्हा त्या विमा सहकंपनी भाग भांडवलात गुंतवणूक करायला सार्वजनिक क्षेत्रातील किंवा खाजगी क्षेत्रातील एका किंवा अनेक बँकांना परवानगी मिळेल. या बँका विम्याची जोखीम पत्करतील परंतु ज्या बँका परिच्छेद २ मधील अटींची पूर्तता करतील त्यांनाच फक्त परवानगी मिळेल.

४. जोखीम पत्करण्याच्या तत्वावर बँकेच्या वा दुस-या बँकेच्या उपकंपनीला विमा कंपन्यात सामील व्हायला सर्वसाधारणपणे परवानगी नसते. सहकंपन्यामध्ये मर्चंट बँकिंग, सिक्युरिटी, म्युच्युअल फंडस्, लीजींग फायनान्स, गृहवित्त व्यवसाय इत्यादी व्यवसाय करणा-या बँकिंग उपकंपन्यांचा समावेश होतो.

५. वर दिल्याप्रमाणे पात्र नसलेल्या बँका बँकेच्या निव्वळ मूल्याच्या (नेटवर्थ) १०% किंवा ५०% यातील जी कमी रक्कम असेल तितकी गुंतवणूक विमा कंपनीत पायाभूत सुविधा व सेवा पुरवण्यासाठी करू शकते. हा सहभाग गुंतवणूक म्हणून समजला जातो व बँकेला कोणतीही प्रासंगीक दायित्व निर्माण करीत नाही.
या बँकांच्या पात्रतेचे निकष खालील प्रमाणे
१) बँकेचा सीआरएआर १० पेक्षा कमी नसावा
२) बँकेची अनुत्पादक मालमत्ता योग्य त्या प्रमाणात असावी
३) बँकेला गेल्या तीन वर्षात निव्वळ नफा मिळालेला असावा

६. विमा व्यवसायात प्रवेश करू इच्छिणा-या सर्व बँकांनी रिझर्व बँकेची पूर्वपरवानगी घेतली पाहिजे. रिझर्व बँक सर्व गोष्टींचा विशेषतः अर्जदार बँकेच्या अनुत्पादक मालमत्तेचा विचार करून प्रकरणावर अवलंबून परवानगी देईल की जेणे करून या अनुत्पादक मालमत्तेमुळे सध्याच्या किंवा पुढील व्यवसायातील जोखमीमुळे बँकिंग व्यवसायावर परिणाम होऊ नये. बँकिंग व विमा या क्षेत्रात थोडेसे दूरचेच संबंध असावेत.

**टीप :**

१) प्रमोटर बँकेने विमा कंपनीत भाग भांडवल घेणे वा विमा व्यवसायात कोणतेही भाग घेणे यावर आयआरडीए/केंद्र सरकार यांनी घालून दिलेल्या नियमांचे व कायद्याचे नियंत्रण राहील. यामध्ये २६% पेक्षा जास्त भाग भांडवलाची ठरलेल्या वेळेत निर्गुंतवणूक करण्याबाबतचा विमा कायदा कलम ६ अअ (आयडीआरए कायदा १९९९ नुसार सुधारलेला) याचा ही समावेश होतो.
२) पात्रता ठरवण्यासाठी लेखा परीक्षा केलेले अद्यतन ताळेबंद व नफा-तोटा पत्रक ग्राहय धरले जाईल

३) ज्या बँका वरील मार्गदर्शक तत्वाच्या परिच्छेद ५ नुसार गुंतवणूक करतील व नंतर विमा कंपन्यात जोखीम स्वीकारण्यासाठी (मार्गदर्शक तत्वाच्या परिच्छेद २ नुसार) पात्र होतील त्या जोखीम स्वीकारण्याचा तत्वाच्या विमा व्यवसाय करण्यासाठी रिझर्व बँकेला अर्ज करायला पात्र ठरतील.

**सूची-४**
**(परिच्छेद १२)**

**बँकांचा विमा व्यवसायात प्रवेश - विमा एजन्सी व्यवसाय/संदर्भ व्यवस्था - रेफरल**

जोखीम न स्वीकारण्याच्या तत्वावर बँक कोणत्याही विमा एजन्सी व्यवसायात किंवा संदर्भ व्यवसायात रिझर्व बँकेच्या पूर्व परवानगी विना भाग घेऊ शकते. मात्र त्याला खालील अटी लागू होतील.

१) 'संयुक्त कॉर्पोरेट एजंट' किंवा विमा कंपनी बरोबर संदर्भ व्यवस्थेसाठी बँकेने आयआरडीए नियमांची पूर्तता करावी.

२) बँकांनी आपल्या ग्राहकांवर त्यांनी वित्त सहाय्य केलेल्या मालमतेच्या विमा उतरवण्यासाठी विशिष्ट विमा कंपनीकडेच जाण्याची त्यांच्यावर सक्ती करू नये. ग्राहकांना त्याबद्दल निर्णय घ्यायचे स्वातंत्र्य असावेत.

३) संदर्भ व्यवस्थेत (रेफरल) भाग घेण्याची इच्छा असलेल्या बँकांनी आयआरडीए नियमांची पूर्तता करण्याबरोबरच विमा कंपनी बरोबर करार करावा की ज्यामध्ये बँकांच्या परिसराचा व पायाभूत सुविधांचा वापर विमा कंपनी करेल. पहिल्यांदा ही व्यवस्था तीन वर्षापेक्षा जास्त नाही अशा कालखंडासाठी असेल व मिळालेल्या सेवेवर अवलंबून बँकेस अटी व शर्ती पुनः ठरवणे किंवा व नव्यानेच करार करणे हे ठरवण्याचा बँकेला अधिकार असेल. त्यानंतर सार्वजनिक क्षेत्रातील बँका भारत सरकारच्या परवानगीने व खाजगी क्षेत्रातील बँका त्यांच्या निदेशक मंडळाच्या परवानगीने बँक दीर्घ मुदतीचा करार करायला स्वतंत्र राहील.

४) बँकेचा विमा प्रॉडक्टसमधील सहभाग हा स्वतःहून असतो ही गोष्ट बँकेने सर्व प्रसिद्धी पत्रकात ठळकपणे दर्शवली पाहिजे. बँक देत असलेल्या बँकिंग सेवा व विमा प्रॉडक्टसचा उपयोग यात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध असता कामा नये.

५) विमा एजन्सी/संदर्भ व्यवस्था या व्यवसायातील जोखीम बँकिंग व्यवसायाकडे हस्तांतरीत होता कामा नये.

**सूची-५**
**(परिच्छेद १३)**

**पेन्शन फंड व्यवस्थापक म्हणून बँकेने काम करण्यासाठीची मार्गदर्शक तत्वे**

**१. पात्रतेचे निकष**

पेन्शन फंड व्यवस्थापक म्हणून व्यवसाय बँकांना फक्त व त्यांचा उप कंपन्याद्वारेच करता येईल. पेन्शन फंड व्यवस्थापनाचे काम खात्याद्वारे करता कामा नये. त्या व्यवसायासाठी स्थापलेल्या उपकंपन्यांना त्यांच्या नावाला प्रतिष्ठा मिळावी व तदनुषांगिक फायदे मिळावे यासाठी बँकांनी आपले नाव/संक्षिप्त नाव द्यावे. परंतु बँका व उपकंपन्या यांचे संबंध 'दूरचेच' असावेत. याबाबतच्या जोखमीबाबत पुरेसे सावधानतेचे उपाय योजावेत आणी फक्त बलवान व पत असलेल्या बँकांचा या व्यवसायात याची खात्री करण्यासाठी खालील निकषांची पूर्तता करणा-या बँकांनी आणी पीएफआरडीए ने ठरवून दिलेल्या शोधन क्षमता फरक (सॉल्व्हन्सी मार्जिन) पूर्तता करणा-या बँका पेन्शन फंड व्यवस्थापनाच्या व्यवसायात भाग घेण्यासाठी परवानगी घ्यायला रिझर्व बँकेकडे अर्ज करू शकतात.

१) बँकेचे निव्वळ मूल्य (नेटवर्थ) रू.५०० कोटी पेक्षा कमी असता नये.

२) गेल्या ३ वर्षात सीआरएआर ११% पेक्षा कमी असता कामा नये.

३) बँकेने गेल्या ३ वर्षात निव्वळ नफा मिळवला असला पाहिजे.

४) मालमत्तेवरील परतावा (रिटर्न ऑन ॲसेटस) किमान ६% किंवा त्यापेक्षा जास्त असावा.

५) अनुत्पादक मालमत्ता (नॉन परफॉमिंग ॲसेट) ३% पेक्षा कमी असावी.

६) बँकेच्या उपकंपन्यांचे कामकाज समाधानकारक असावे. बँकेच्या गुंतवणूक पोर्टफोलियोचे व्यवस्थापन रिझर्व बँकेच्या एएफआय अहवालानुसार चांगले असावे व त्यामध्ये वरिष्ठांनी काळजी करावी असे प्रतिकूल शेरे असू नयेत.

**२. पेन्शन फंड उपकंपन्या - सुरक्षिततेचे उपाय**

वरील पात्रता निकषांची, तसेच पीएफआरडीए ने पेन्शन फंड व्यवस्थापन व्यवसायासाठी घालून दिलेल्या निकषांची पूर्तता करणा-या बँकांना पेन्शन फंड व्यवस्थापनासाठी उपकंपन्या स्थापन करण्यासाठी परवानगी देण्यात येईल. मात्र त्यासाठी खालील अटी लागू होतील.

१) बँकेने उपकंपनी स्थापन करण्यासाठी तिच्या भाग भांडवलामध्ये गुंतवणूक करण्यासाठी रिझर्व बँकेची पूर्वपरवानगी घ्यावी. हे भाग भांडवल हस्तांतरीत करणे किंवा त्याचे कोणते ही व्यवहार करणे यासाठी ही रिझर्व बँकांची पूर्व परवानगी आवश्यक आहे.

२) उपकंपनीचे संचालक मंडळ सर्वसमावेशक असावे व पीएफआरडीए ने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार (असल्यास) असावे.

३) बँकेने उपकंपनीबरोबर दूरचे संबंध ठेवावेत. बँक व उपकंपनी यातील व्यवहार बाजार दराने व्हावेत.

४) बँक उपकंपनीमध्ये अधिक भाग भांडवल घेऊ इच्छित असेल तर त्यासाठी रिझर्व बँकेची पूर्वपरवानगी लागेल. कोणत्याही वेळी बँकेने उपकंपन्यांच्या भाग भांडवलात केलेली गुंतवणूक बँकेच्या भरलेल्या भाग भांडवलाच्या (पेड-अप-कॅपिटल) व गंगाजळी याच्या १०% पेक्षा जास्त असता कामा नये.

५) बँकेची सध्याच्या उपकंपन्यामधील भाग भांडवल, प्रस्तावित पेन्शन फंड उपकंपनीतील भाग भांडवल व इतर वित्तीय सेवा कंपनीतील पोर्टफोलियो गुंतवणूक व म्युच्युअल फंड गुंतवणूक ही तिच्या भरलेल्या भाग भांडवल ( पेड-अप-कॅपिटल) व गंगाजळीच्या २०% पेक्षा जास्त असता कामा नये.

६) बँकेच्या निदेशक मंडळाने उपकंपनी धरून गटासाठी एक सर्वंकष जोखीम धोरण घालून द्यावे. त्यामध्ये योग्य त्या जोखीम व्यवस्थापन साधनाचा समावेश असावा. धोरणामध्ये त्यांच्या परिणामकारक अवलंबाचा समावेश असावा.

७) उपकंपनीच्या कार्यावर लक्ष देण्यासाठी बँकेने योग्य ती व्यवस्था घालून द्यावी.

८) उपकंपनीने आपला व्यवसाय पेन्शन फंड व्यवस्थापन व व्यवसायापुरता मर्यादित ठेवावा किंवा त्याला थेट संबंधित असलेलाच.

९) पेन्शन फंड उपकंपनीने रिझर्व बँकेच्या परवानगी शिवाय दुसरी उपकंपनी उघडू नये.

१०) उपकंपनीने दुसरी कंपनी (की जी तिची उपकंपनी नाही) रिझर्व बँकेच्या पूर्वपरवानगी शिवाय निर्माण करू नये.

११) रिझर्व बँकेच्या पूर्वपरवानगी शिवाय उपकंपनीने कोणत्याही कंपनीचा ताबा मिळवण्यासाठी समभाग इत्यादी घेण्याच्या उद्देशाने पोर्टफोलियो गुंतवणूक करू नये.

१२) बँकेने उपकंपनीच्या पाच वर्षाच्या भविष्यातील व्यवसाय योजना सादर कराव्यात व त्यामुळे उपकंपनी पीएफआरडीए ने ठरवलेलेल्या शोधन क्षमता फरक (सॉल्व्हन्सी मार्जिन) ची पूर्तता करील काय व आपले भांडवल बळकट करण्यासाठी बँकेवर अवलंबून रहाणार नाही हे रिझर्व बँकेला ठरवता येईल.

१३) रिझर्व बँकेने बँकेला उपकंपनी स्थापन करण्याची दिलेली परवानगी व पीएफआरडीए चा उपकंपनीत पेन्शन फंड व्यवस्थापन व्यवसाय करायला परवाना पत्र देणे यांचा काही संबंध नसेल.

१४) पीएफआरडीए ने वेळोवेळी पेन्शन फंड व्यवस्थापनाबाबत जारी केलेल्या सर्व सूचना, मार्गदर्शक तत्वे इत्यादींचे उपकंपनीने पालन करावे.

१५) बँकेच्या ग्राहकांनी बँकेकडे ठेवलेल्या खात्यापर्यत उपकंपनीला ऑन लाईन पोच नाही याची बँकेने खात्री करून घ्यावी.

१६) बँकेच्या यंत्रणा/व्यवस्थांची एकात्मता टिकवण्यासाठी बँकेला तसेच उपकंपन्यामध्ये यंत्रणा /व्यवस्थामध्ये आवश्यक त्या सुरक्षायंत्रणांची व्यवस्था करावी.

१७) 'आर्थिक समूह' (फायनान्शियल कॉंग्लोमेरेटस्) या व्यवस्थेखाली अहवालाच्या ज्या आवश्यकता आहेत त्याची बँकेने पूर्तता करावी.

१८) बँकेने सहकंपनीला (जॉईट व्हेंचर) किंवा उपकंपनीला रिझर्व बँकेच्या पूर्वपरवानगी विना विनातारण आगाऊ रक्कम देऊ नये.

सूची

## ह्या महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी

| क्रमांक | परिपत्रकांची सूची क्रमांक | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १. | आरबीआई/२०१०-११/४४९ डीपीएसएस .को.पीडी.२२२४/०२.१४.००३/२०१०-११ | मार्च २९, २०११ | सुरक्षेचे प्रश्न व जोखीम कमी करण्याचे उपाय – क्रेडिट/डेबिट कर्जाचा उपयोग करतांना, कार्डधारकांना सावधानतेचा इशारा |
| २. | आरबीआई/२०१०-११/३४७ डीपीएसएस .को.क्र.१५०३/०२.१४.००३/२०१०-११ | डिसेंबर ३१, २०१० | कार्ड नॉट प्रेझेंट व्यवहारासंबंधातील सुरक्षेचे प्रश्न व जोखीम कमी करण्याचे उपाय |
| ३. | आरबीआई/२००९-१०/२८३ डीबीओडी .क्र. एफएसडी. बीसी.६७/२४.० १.००१/२००९-<br>१० | जानेवारी ०७, २०१० | ताळेबंदातील प्रकटीकरणे- बँकांचा इंशुअरन्स व्यवहार |
| ४. | आरबीआई/२००९-१०/२२५ डीबीओडी.क्र.एफएसडी.बीसी.६०/२४.०१.००१/२००९-<br>१० | नोव्हेंबर १६, २००९ | बँकांव्दारे, म्युच्युअल फंड/विमा इत्यादि उत्पादांच विपणन/वितरण |
| ५. | आरबीआई/२०१०-११/६० डीबीओडी .क्र. एफएसडी. बीसी. १७/२४.०१.००१/२०१०-<br>११ | जुलै १, २०१० | पॅरा-बँकिंग कार्यकृतींवरील महापरिपत्रक |
| ६ | आर बी आय /२००६ -२००७/४४६ डीबीओडी.क्र.एफएसडी.बीसी .१०२/२४.०१.०२२/२००६-०७ | जून २८, २००७ | बँकाद्वारे पेन्शन फंड व्यवस्थापन |
| ७ | आर बी आय /२००६-०७/१४० आयडीमडी.पीडीआरएस .१४३१/०३.६४.००/ २००६-२००७ | ऑक्टोबर ५, २००६ | प्राथमिक विक्रेता व्यवसाय करणा-या/करू इच्छिणा-या बँकांसाठी अमलात आणण्याची मार्गदर्शक तत्वे |
| ८ | आर बी आय /२००६-०७/१०४ डीबीओडी.क्र.एफएसडी.बीसी .२५/ २४.९२.००१/२००६-०७ | ऑगस्ट ९, २००६ | प्राथमिक विक्रेता व्यवसाय करणा-या बँकांसाठी मार्गदर्शक तत्वे |
| ९ | आर बी आय २००५-०६/ ३०८ डीबीओडी.क्र.एफएसडी.बीसी ६४/ २४.९२.००१/ २००५-०६ | फेब्रुवारी ७, २००६ | बँकासाठी सारासार विचार कर्ज मर्यादा (प्रूडेंशियल क्रेडीट एक्सपोजर लिमिटस्) - वार्षिक धोरण विषयक निवेदन २००४-०५ |
| १० | आर बी आय/२००४/२६० डीबीओडी.बीपीबीसी.क्र .१००/२१.०३. ०५४/२००३-०४ | जून २१, २००४ | बँकांचा विमा व्यवसायात प्रवेश |
| ११ | डीबीओडी.एफएससी.बीसी .२७/२४.०१.०१८/ २००३-२००४ | सप्टेंबर २२, २००३ | बँका द्वारे स्मार्ट कार्ड जारी करणे |
| १२ | डीबीओडी.एफएससी.बीसी .८८/२४.०१.०११ A/२००१-०२ | एप्रिल ११, २००२ | बँका द्वारे डेबिट कार्ड जारी करणे |
| १३ | डीबीओडी.एफएससी.बीसी .३२/२४.०१.०१९/ | सप्टेंबर २९, २००१ | बँका द्वारे स्मार्ट कार्ड/डेबिट कार्ड जारी करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे |

| | | | |
|---|---|---|---|
| | २००१-०२ | | |
| १४ | डीबीओडी.एफएससी.बीसी<br>.१३३/२४.०१.०१<br>९/२०००-०१ | जून १८, २००१ | बँका द्वारे क्रेडीट/ डेबिट कार्ड जारी करणे |
| १५ | डीबीओडी.एफएससी.बीसी<br>.४१/२४.०१.०११/<br>२०००-०१ | ऑक्टोबर ३०, २००० | बँकाचा विमा व्यवसायात प्रवेश |
| १६ | डीबीओडी.एफएससी.बीसी<br>/१६/२४.०१.०१८/<br>२०००-२००१ | ऑगस्ट ९, २००० | मनिमार्केट म्युच्युअल फंड (एमएमएमएफ) च्या बाबतची मार्गदर्शक तत्वे |
| १७ | डीबीओडी.एफएससी.बीसी<br>.१४५/२४.०१.०१३-२००० | मार्च ७, २००० | बँका द्वारे स्मार्ट कार्ड/डेबिट कार्ड जारी करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे |
| १८ | डीबीओडी.एफएससी.बीसी<br>.१२३/२४.०१.०१९/९९-२००० | नोव्हेंबर १२, १९९९ | बँकासाठी सारासार विचार कर्ज मर्यादा (प्रूडेंशियल क्रेडिट एक्सपोजर लिमिटस्) - वार्षीक धोरण विषयक निवेदन २००४-०५ |